MHYA210002362026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३७/२०२६**
**सुनंदा + ०२ वि. कोणीही नाही**

## निशाणी क्र.०१ वर आदेश.

अर्जदार यांनी सदरचा अर्ज वारस दाखला मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, मयत **आनंदराव श्रावण बोंडे** यांचे दि.**०५/१२/२०२५** रोजी निधन झालेले आहे. अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी आहे. तसेच, अर्जदार क्र.२ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच मयताची आई नामे **बहिणाबाई श्रावण बोंडे** यांचे देखील दि.**२२/१२/२०२५** रोजी निधन झालेले आहे. मयताला अर्जदारांशिवाय इतर कोणीही वारस नाही.

३. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, मयत हे वे.को.ली मध्ये नौकरीवर होते. मयत यांचा मृत्यु झाला असल्यामुळे त्यांचे वारसांना वे.को.ली मध्ये अनुकंपा तत्वावर नौकरी मिळणार आहे. तरी अर्जदारांना मयत **आनंदराव श्रावण बोंडे** यांचे वारस असल्याबाबत सदर प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच अर्जदारांना इतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

४. अर्जदारांच्या मागण्यांना इतर कोणाचा आक्षेप आहे का ते पाहण्यासाठी न्यायालयाच्या आवारात, तहसिल कार्यालय वणी, ग्रामपंचायत मुंगोली व दैनिक वर्तमानपत्र **"लोकदुत"** दि.**२५/०२/२०२६** नुसार जाहीर हरकती मागविल्या होत्या. परंतु, नमुद मुदतीत अद्याप पर्यंत कुणीही हरकती घेतलेल्या नाहीत.

५. अर्जदार यांनी अर्जदार क्र.१ हिचे सरतपासणीचे शपथपत्र **नि.क्र.१०** वरती दाखल करुन अर्जातील नमुद मजकूर पुर्नकर्थीत करुन **नि.क्र.१८** वर त्यांचा पुरावा बंद केलेला आहे. अर्जदारांनी शपथपत्रातील मजकूराच्या सत्यतेसाठी मयत **आनंदराव श्रावण बोंडे** यांच्या मृत्यु–प्रमाणपत्राची प्रत **नि.क्र.११**, बहिणाबाई यांचे मृत्यु–प्रमाणपत्राची प्रत **नि.क्र.१२**, वे.को.ली, मुंगोली यांनी जारी केलेला कार्यालयीन आदेशाची प्रत **नि.क्र.१३**, अर्जदारांचे पडताळणी केलेले आधार कार्डची प्रत **नि.क्र.१४ ते १६**. तसेच दैनिक वर्तमानपत्र **"लोकदुत"** दि.**२५/०२/२०२६ नि.क्र.१७** रोजीची सत्यप्रत दाखल केलेली आहे.

६. अर्ज वाचला. अर्जदारांनी ते मयत **आनंदराव श्रावण बोंडे** यांचे वारस असुन त्यांच्या वारसांना अनुकंपावर नौकरी मिळण्यासाठी वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. अर्जदाराच्या **नि.क्र.१०** वरील साक्षी पुराव्याच्या शपथपत्रामध्ये तिने मयत **आनंदराव श्रावण बोंडे** यांचे वारस असुन, त्यांना अनुकंपावर नौकरी मिळण्याकरीता वारस प्रमाणपत्र देण्याची विनंती केलेली आहे. अर्जदारांनी दाखल केलेली कागदपत्रे व अर्जदारच्या **नि.क्र.१०** वरील साक्षी पुराव्याच्या शपथपत्रावरुन सकृतदर्शनी असे दिसून येते की, मयत **आनंदराव श्रावण बोंडे** यांचे निधन झालेले असुन, त्यांना अर्जदारांच्या व्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांच्या मागणीस दिलेल्या कालावधीमध्ये कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदारांचा पुरावा फेटाळण्याचे कोणतेही कारण नाही. **मुंबई अधिनियम १८२७ VIII** चा हेतु हा मयताच्या वारसांची ओळख पटविण्याचा असुन, सदर अधिनियमाच्या नियम २ व ३ प्रमाणे वारसांच्या मागणीस कोणाचाही आक्षेप नसल्यास त्यांच्या हक्कात न्यायालय वारस प्रमाणपत्र देवु शकते. त्यामुळे दाखल कागदपत्रांवरुन अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे निष्पन्न होत आहे.

त्यामुळे **मुंबई अधिनियम कायद्याचे कलम २ व ३** प्रमाणे अर्जदारांचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मुंबई अधिनियम कायदा १८७२ प्रमाणे अर्जदार क्र.१ ते ३ यांना मयत **आनंदराव श्रावण बोंडे** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र योग्य त्या तरतुदीं प्रमाणे देण्यात यावे.

३. अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्राचा उपयोग भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५ मधील उत्तराधिकारी प्रमाणपत्र संबंधीत तरतुदी तसेच महाराष्ट्र न्यायालयीन शुल्क कायदा, १९५९ ची सुची १, अनुच्छेद ११ प्रमाणे आर्थीक लाभ मिळविण्यासाठी करता येणार नाही.

४. अर्जदारांना आदेशीत करण्यात येते की, त्याने सदर प्रमाणपत्रावरुन मिळविलेल्या मालमत्तेची पुर्ण व सत्य आणि प्रमाणीत यादी दिवाणी नियमावलीच्या प्रकरण १४ चे परिच्छेद क्र.३१२ प्रमाणे आदेशापासुन सहा महिन्याच्या आत दाखल करावी.

BIRADAR AMOL BALAJI
Digitally signed by BIRADAR AMOL BALAJI
Date: 2026.04.08 16:40:36 +0530

**( ए. बी. बिरादार )**
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
वणी.

दिनांक : ०८/०४/२०२६.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order are same, word to word, as per the original Order:

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | G.J.Bhadke |
| Name of Court | : | 2nd Jt.Civil Judge Junior Division, Wani. |